2 6 FEB 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १९८६ युवक, युवतींना मिळाली नोकरी

## राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्यात निवड झालेल्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन आणि विद्यापीठ विकास मंचच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्यात निवड झालेल्या १९८६ युवक व युवतीना मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्रे देण्यात आली.



कोल्हापूर : राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्र प्रदान करतान प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव सोबत मान्यवर.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामध्ये राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठ परिसरामधील विविध अधिविभागांमध्ये मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, ४ हजार ९३७ युवक व युवतींना मुलाखतीच्या दुसऱ्या फेरीसाठी निवडण्यात आले. त्याचबरोबर, ४६८० युवक व युवतीचे शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे कागदपत्रे कंपनीच्या प्रतिनिधींनी पुढील कार्यवाहीसाठी जमा करून घेतली. मेळाव्यामध्ये हजारो युवक व युवतीना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या.

मेळाव्यात विविध कंपनीच्या एकूण ९ हजार जागांसाठी १७ हजार ८७२ युवक व युवती उपस्थित राहिले. या रोजगार मेळाव्यामध्ये १३७ कंपन्या सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने इंजिनीअरिंग, मेडिकल, फार्मा, मॅन्युफॅक्चरिंग, बँकिंग, फायनान्स, विमा, अकाउंटिंग, आरोग्यसेवा, ऑटोमोबाईल, आयटी, नर्सिंग यांचा समावेश आहे.

दरम्यान, विद्यापीठाचे विविध अधिकारी, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फौंडेशन व विद्यापीठ विकास मंचचे अधिकारी यांनी मुलाखत कक्षास भेट देवून पाहणी केली. नोकरी महामेळावा आयोजनासाठी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे, विद्यापीठ विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. एन. डी. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, प्रशिक्षण अधिकारी शामल पवार, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फौंडेशनचे प्रतिनिधी नितीन माने, नेहा कुंभार यांचे सहकार्य लाभले.

### मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

मेळावा यशस्वी करण्यासाठी मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी नेटके नियोजन केले. याकामी विद्यापीठाच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, आधिविभागप्रमुख, शिक्षक, प्लेसमेंट अधिकारी, स्वयंसेवक यांनी योगदान दिले. रोजगार मेळाव्यास विद्यार्थी, विद्यार्थिनींचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

2 6 FEB 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्यामध्ये निवड झालेल्या उमदेवारांना नियुक्ती पत्रे



कोल्हापूर : राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्यात मुलाखतीमध्ये निवड झालेल्या युवक व युवतींना त्याच दिवशी सायंकाळी मान्यवरांचे हस्ते नियुक्ती पत्रे देण्यात आली.

- शिवाजी विद्यापीठात झाला होता मेळावा
- नियुक्ती पत्रे मिळालेल्यांत १,९८६ युवक व युवतींचा समावेश
- ४,९३७ युवक व युवतींची मुलाखतीच्या दुसऱ्या फेरीसाठी निवड

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन आणि विद्यापीठ विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने २२ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामध्ये राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठ परिसरामधील विविध अधिविभागांमध्ये मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. मुलाखतीमध्ये निवड झालेल्या १,९८६ युवक व युवतींना त्याच दिवशी सायंकाळी मान्यवरांचे हस्ते नियुक्ती पत्रे देण्यात आली.

दरम्यान, विद्यापीठाचे विविध अधिकारी, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फौंडेशन व विद्यापीठ विकास मंचचे अधिकारी यांनी मुलाखत कक्षास भेट देवून पाहणी केली. नोकरी महामेळावा आयोजनासाठी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव, कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे, विद्यापीठ विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. एन. डी. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, प्रशिक्षण अधिकारी शामल पवार, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फौंडेशनचे प्रतिनिधी नितीन माने, नेहा कुंभार यांचे सहकार्य लाभले.

मेळावा यशस्वी करण्यासाठी मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी नेटके नियोजन केले. याकामी विद्यापीठाच्या अधिसभा व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, आधिविभागप्रमुख, शिक्षक, प्लेसमेंट अधिकारी, स्वयंसेवक यांनी योगदान दिले.

**१७,८७२ जण उपस्थित.**

मेळाव्यामध्ये हजारो युवक व युवतीना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. विविध कंपनीच्या एकूण ९,००० जागांसाठी १७,८७२ एवढे युवक व युवती उपस्थित राहिले. या रोजगार मेळाव्यामध्ये १३७ कंपन्या सहभागी झाल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने इंजिनीअरिंग, मेडिकल, फार्मा, मॅन्युफॅक्चरिंग, बँकिंग, फायनान्स, विमा, अकाउंटिंग, आरोग्यसेवा, ऑटोमोबाईल, आयटी, नर्सिंग यांचा समावेश आहे.

## ४,६८० जणांची कागदपत्रे करुन घेतली जमा...

दरम्यान, ४,९३७ एवढ्या युवक व युवतींना मुलाखतीच्या दुसऱ्या फेरीसाठी निवडण्यात आले. त्याचबरोबर ४,६८० एवढ्या युवक व युवतीचे शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे कागदपत्रे कंपनीच्या प्रतिनिधींनी पुढील कार्यवाहीसाठी जमा करून घेतली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 FEB 2026 पुढारी

# विद्यापीठात आजपासून भारतीय अर्थमिती संस्थेची राष्ट्रीय परिषद

## तीन दिवस विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग, भारतीय अर्थमिती संस्था आणि डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात गुरुवारपासून (दि. २६) भारतीय अर्थमिती संस्थेच्या हीरक महोत्सवानिमित्त तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शाहू सिनेट सभागृहात २८ फेब्रुवारीपर्यंत ही परिषद होणार आहे. सकाळी साडेनऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

सकाळी साडेनऊ वाजता पंतप्रधान कार्यालयाचे आर्थिक सल्लागार समितीचे चेअरमन डॉ. एस. महेंद्र देव यांच्या उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. तीन दिवसांत यावेळी डॉ. नीरज हातेकर, प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांची प्रमुख उपस्थिती आहे. या परिषदेत भारतीय अर्थमिती संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. चंद्रशेखर, आयआयटीचे डॉ. विनिश कथुरिया, आयएसआयचे डॉ. प्रबळरॉय चौधरी, डॉ. ए. गणेशकुमार यांच्यासह विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.




डॉ. एस. महेंद्र देव डॉ. नीरज हातेकर

2 6 FEB 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'भोगावती'मध्ये रसायनशास्त्रावर ऑनलाईन परिषद

शाहूनगर, ता. २५ : कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्यावतीने रसायनशास्त्रची एकदिवसीय राष्ट्रीय परिषद ऑनलाईन झाली. अध्यक्षस्थानी भोगावती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष दिगंबर मेडसिंगे होते.

परिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर इनोव्हेशन व इन्क्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. सागर डेळेकर म्हणाले, "विकसित भारत संकल्पनेमध्ये संशोधनाचे योगदान मोठे आहे. संशोधकांनी संशोधन मर्यादित न ठेवता त्याचे स्टार्टअपमध्ये रूपांतर करावे. भारत सरकार नाविन्यपूर्ण संशोधन व स्टार्टअपसाठी प्रोत्साहन देत आहे.संशोधकांनी यामध्ये योगदान द्यावे." दिगंबर मेडसिंगे म्हणाले, "संशोधनासाठीही सुविधा महाविद्यालयामार्फत उपलब्ध करून दिल्या जातील."

परिषदेत देशातील विविध राज्यांमधून संशोधक विद्यार्थी सहभागी होते. संयोजक प्रा.डॉ. डी. के. दळवी यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. डी. ए. चौगले यांनी प्रास्ताविक केले. परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ संभाजीनगर उपविभाग धाराशिवचे रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. के. पाटील, तरसाडिया युनिव्हर्सिटी गुजरातचे प्रा. डॉ. ए. एच. गोरे यांनी मार्गदर्शन केले. परिषदेतील सहभागी संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन पेपर ऑनलाईन सादर केले. शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्रचे प्रा. डॉ. जी. बी. कोळेकर यांनी रसायनशास्त्राचे महत्त्व विशद केले. प्रा. व्ही. आर. पाटील व प्रा. आर. एस. भुईंगडे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. एन. एम. पाटील यांनी आभार मानले. यावेळी भोगावती शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मोहन पाटील व संचालक डॉ. आर. एस. कांबळे, डॉ. निवास पाटील, डॉ. डी. आर. चांदम, डॉ. एस. बी. मुल्लाणी, प्रा. एम. पी. पवार, प्रा. सागर पाटील, ग्रंथपाल पी. एस. कल्लोळी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ,

26 FEB 2026

# मातृभाषा विकासासाठी वाचन, लेखन हवे

## प्रा. डॉ. रणधीर शिंदे : 'विवेकानंद'मध्ये आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन

**■ सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : 'मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते, तेवढे दुसऱ्या भाषेत व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे. मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेत विकसित होते. साहित्याकडे डोळसपणे पाहण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे,' असे प्रतिपादन लेखक व समिक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. ते विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ व 'आयक्युएसी' यांच्यातर्फे पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये झालेल्या पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनात बोलताना प्रा. रणधीर शिंदे. सोबत कौस्तुभ गावडे व इतर मान्यवर.

डॉ. शिंदे म्हणाले, 'आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी युवा साहित्य संमेलन घेणारे विवेकानंद कॉलेज हे एकमेव महाविद्यालय आहे. शारीरिक व मानसिक आरोग्य, नातेसंबंध, व्यावसायिक मूल्यविकास, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक योगदान यावर विद्यार्थ्यांनी गंभीर विचार करण्याची आवश्यकता आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी लिहिलेली दैनंदिनी प्रमाण मानून विद्यार्थ्यांनीही दैनंदिनी लिहिली पाहिजे आणि हीच साहित्य लेखनाची सुरुवात असते.'' संमेलनाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाचे आयोजन केले होते. प्रथम सत्रात किरण गुरव यांची प्रकट मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. दुसऱ्या सत्रात कवी विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली युवा कवी संमेलन झाले. प्रा. सतीश उपळावीकर, डॉ. कैलास पाटील, डॉ. इरफान मुजावर यांनी कविता सादर केल्या. संमेलनाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसर ते ग्रंथालय या मार्गावरील ग्रंथदिंडीने टाळ व मृदंगाच्या गजरात झाली. समन्वयक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. अविनाश गायकवाड व डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी सूत्रसंचालन केले. स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी श्रावणी पाटील हिने मनोगत व्यक्त केले. डॉ. कविता तिवडे, डॉ. दीपक तुपे, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. नीता पाटील, हितेंद्र साळुंखे, डॉ. शुभांगी काळे, प्रा. एच. व्ही. चामे, डॉ. ए. एस. महात, प्रा. अश्विनी खवळे, प्रा. सनी काळे, डॉ. स्नेहा देसाई, प्रा. रोहिणी रेळेकर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी संयोजन केले.

### नवोदितांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देण्याचा प्रयत्न

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, ''धावपळीच्या जीवनात आयुष्याला उभे करण्यासाठी माणूस सतत संघर्ष करीत आहे. हा संघर्ष साहित्यातून चित्रित होतो. त्यासाठी युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्यासाठी आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी अशा युवा साहित्य संमेलनांची आवश्यकता असते.'

2 6 FEB 2026

तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ७५१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परिक्षेच्या ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर ७५१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. बुधवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ९ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी २७९ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

26 FEB 2026

तरूण भारत

# डॉ. म. सु. पाटील वैश्विक दृष्टीकोनाचे समीक्षक

**■ डॉ. दिलीप धोंगड**



**कोल्हापूर :** डॉ. म. सु. पाटील यांची समीक्षा व्रतस्थ, प्रमेयदर्शी आहे. त्यांनी निष्ठापूर्व, गांभीर्यपूर्वक समीक्षा लिहिली आहे. तसेच प्रबंधात्मक ग्रंथ लिहिले. ते वैश्विक दृष्टिकोन अंगीकारलेले समीक्षक होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दिलीप धोंगडे (नाशिक) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभाग, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन आणि नव–अनुष्टुभ प्रतिष्ठान, येवला (नाशिक) यांच्या वतीने आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. डॉ. म. सु. पाटील यांच्या कन्या–मराठीतील प्रसिध्द लेखिका नीरजा यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. धोंगडे म्हणाले, आदिबंधात्मक समीक्षा ही मानसशास्त्रातून आलेली आहे. त्यांनी लेखकाभ्यासाला एक नवी प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी कर्तव्यबुध्दीने विपुल समीक्षा लिहून समीक्षेचा विस्तार मोठया प्रमाणात केला. समीक्षेचा प्रदेश हा साकल्याचा आहे तो त्यांनी कधीही आखडू दिला नाही.

डॉ. प्रविण बांदेकर म्हणाले, मागील काही वर्षांमध्ये खेड्यापाड्यातील लिहित्या मंडळींना एक व्यासपीठ मिळवून दिले आहे. दरम्यान ज्येष्ठ लेखक डॉ. राजन गवस, डॉ. अशोक केळकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांचा सत्कार डॉ. राजन गवस यांच्या हस्ते करण्यात आला.

26 FEB 2026

Times of India

Estd: 1962

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

### Revised Notification II

In view of Government of Maharashtra resolution Sankirn-2025/E-860421/Vishi-1, dated 11th February, 2026 regarding revised procedure for the recruitment of teachers in State Public Universities (Non-Agricultural) the date to apply for the following teaching posts are as below -

- **For online application from 26th February, 2026 to 12th March, 2026.**
- **For submission of hard copies of application form and revised Standard Format is 18th March, 2026 up to 6.00 p.m. in the University office.**

The details of this advertisements are published in Revised Notification II on University's official website **www.unishivaji.ac.in (URL https: //www. unishivaji.ac.in/ recruitments/At-University)**. The interested candidate may apply within the said period and the candidates who have applied already shall go through this notification, original advertisement and do the needful as per directions in Notification.

| Advt. No. | Name of the Post | Total Posts |
|---|---|---|
| | **Teaching Posts** | |
| 22/2024 | Director / Professor, Yashwantrao Chavan School of Rural Development Adhyasan | 01 |
| 23/2024 | Associate Professor | 08 |
| | Director, Rajarshi Shahu Research Centre and Museum Complex | 01 |
| 24/2024 | Assistant Professor | 43 |
| | Coach- (Equivalent to Assistant Professor ) | 02 |
| | Project Officer (Equivalent to Assistant Professor) | 01 |
| | Assistant Director/Assistant Professor | 16 |
| | **Statutory Post** | |
| 40/2024 | Director, Knowledge Resource Centre, Barr. B. K. Knowledge Resource Centre | 01 |

All other terms and conditions mentioned in said advertisements will remain same.

**By order,**

(Dr. V. N. Shinde)
Registrar,
Shivaji University, Kolhapur

Ref. No. SU/EST/PG/186
Date: 25/02/2026

26 FEB 2026

पुढारी

Estd: 1962

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## Revised Notification II

In view of Government of Maharashtra resolution Sankirn-2025/E-860421/Vishi-1, dated 11th February, 2026 regarding revised procedure for the recruitment of teachers in State Public Universities (Non-Agricultural) the date to apply for the following teaching posts are as below -

- **For online application from 26th February, 2026 to 12th March, 2026.**
- **For submission of hard copies of application form and revised Standard Format is 18th March, 2026 up to 6.00 p.m. in the University office.**

The details of this advertisements are published in Revised Notification II on University's official website **www.unishivaji .ac.in (URL https: //www. unishivaji.ac.in/ recruitments/At-University).** The interested candidate may apply within the said period and the candidates who have applied already shall go through this notification, original advertisement and do the needful as per directions in Notification.

| Advt. No. | Name of the Post | Total Posts |
|---|---|---|
| | **Teaching Posts** | |
| 22/2024 | Director / Professor, Yashwantrao Chavan School of Rural Development Adhyasan | 01 |
| 23/2024 | Associate Professor | 08 |
| | Director, Rajarshi Shahu Research Centre and Museum Complex | 01 |
| 24/2024 | Assistant Professor | 43 |
| | Coach- (Equivalent to Assistant Professor ) | 02 |
| | Project Officer (Equivalent to Assistant Professor) | 01 |
| | Assistant Director/Assistant Professor | 16 |
| | **Statutory Post** | |
| 40/2024 | Director, Knowledge Resource Centre, Barr. B. K. Knowledge Resource Centre | 01 |

All other terms and conditions mentioned in said advertisements will remain same.

**By order,**

(Dr. V. N. Shinde)
Registrar,
Shivaji University, Kolhapur

Ref. No. SU/EST/PG/186
Date: 25/02/2026

26 FEB 2026

पुण्यनगरी

Estd: 1962

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## Revised Notification II

In view of Government of Maharashtra resolution Sankirn-2025/E-860421/Vishi-1, dated 11th February, 2026 regarding revised procedure for the recruitment of teachers in State Public Universities (Non-Agricultural) the date to apply for the following teaching posts are as below -

- **For online application from 26th February, 2026 to 12th March, 2026.**
- **For submission of hard copies of application form and revised Standard Format is 18th March, 2026 up to 6.00 p.m. in the University office.**

The details of this advertisements are published in Revised Notification II on University's official website **www.unishivaji.ac.in (URL https: //www. unishivaji.ac.in/ recruitments/ At-University).** The interested candidate may apply within the said period and the candidates who have applied already shall go through this notification, original advertisement and do the needful as per directions in Notification.

| Advt. No. | Name of the Post | Total Posts |
|---|---|---|
| | **Teaching Posts** | |
| 22/2024 | Director / Professor, Yashwantrao Chavan School of Rural Development Adhyasan | 01 |
| 23/2024 | Associate Professor | 08 |
| | Director, Rajarshi Shahu Research Centre and Museum Complex | 01 |
| 24/2024 | Assistant Professor | 43 |
| | Coach- (Equivalent to Assistant Professor ) | 02 |
| | Project Officer (Equivalent to Assistant Professor) | 01 |
| | Assistant Director/Assistant Professor | 16 |
| | **Statutory Post** | |
| 40/2024 | Director, Knowledge Resource Centre, Barr. B. K. Knowledge Resource Centre | 01 |

All other terms and conditions mentioned in said advertisements will remain same.

**By order,**

Ref. No. SU/EST/PG/186
Date: 25/02/2026

(Dr. V. N. Shinde)
Registrar,
Shivaji University, Kolhapur